|जे का रंजले गांजले | प्यासी करूया आपुले||

श्री शिवाजी शिक्षण संस्था, कराडचे  उच्च शिक्षण मंडळ कराड

# वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

ता.कराड जि. सातारा

## सौ.वेणूताई चव्हाण जयंती समारंभ

## सूचना

वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड व यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, कराड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वेणूताई चव्हाण जयंती समारंभ उद्या रविवार दिनांक 2 फेब्रुवारी, 2025 रोजी महाविद्यालयात संपन्न होत आहे. त्यानिमित्ताने सकाळी 9.00 वाजता प्रतिमा पूजन करण्यात येईल. तसेच या समारंभां निमित्त आयोजित व्याख्यान सकाळी 10.00 वाजता लेक्चर हॉल 3 तीन मध्ये सुरू होईल.

महाविद्यालयातील सर्व सहकारी प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांनी समारंभास उपस्थित राहणे आवश्यक आहे.

प्रभारी प्राचार्य

VENUTAI CHAVAN COLLEGE, KARAD Estd. 1st May 1971

|जे का रंजले गांजले | प्यासी करूया आपुले||

श्री शिवाजी शिक्षण संस्था, कराडचे उच्च शिक्षण मंडळ कराड

# वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

ता.कराड जि. सातारा

## सौ.वेणूताई चव्हाण जयंती समारंभ

## अहवाल

दि. २ फेब्रुवारी २०२५ रोजी वेणूताई चव्हाण यांच्या ९९ व्या जयंतीनिमित्त वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड आणि यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, कराड यांच्या संयुक्त विद्यमाने **'वात्सल्यसिंधू सौ. वेणूताई'** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानाच्या साधन व्यक्ती मुधोजी कॉलेज फलटणचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रभाकर पवार हे होते.

सदर कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयातील प्रांगणात सौ. वेणूताई चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून प्रतिमा पूजनाने झाली. त्यानंतर सौ. वेणूताई यांच्या जीवनावर आधारित तयार केलेल्या भितीपत्रिकेचे प्रकाशन मान्य. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. नंतर कलारंजन सभागृह येथे व्याख्यानाच्या कार्यक्रमास प्रारंभ झाला. सुरुवातीस ११ वी कॉमर्स या वर्गातील विद्यार्थिनींनी स्वागत गीत गायले. यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य श्रीमती प्रा. डॉ. एस आर. सरोदे यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाचे महत्त्व सांगून महाविद्यालयातील विविध उपक्रमांची माहिती दिली. त्यानंतर कनिष्ठ विभागातर्फे वेणुताई चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना गुणानुक्रमे बक्षीसे देण्यात आली.

प्रा. डॉ. जे.यु. दीक्षित यांनी प्रमुख पाहुण्याची ओळख करून दिली. प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.प्रभाकर पवार यांनी आपल्या व्याख्यानाला सुरुवात केली. यावेळी ते म्हणाले, 'मा. यशवंतराव चव्हाण साहेब यांची ओळख देशभक्त स्वातंत्र्य सेनानी म्हणून सर्वश्रुत आहेच परंतु त्यांना राष्ट्रभक्तीसाठी साथ देणाऱ्या व प्रेरणा देणाऱ्या, कुटुंबाबरोबर राष्ट्रीय कार्यासाठी स्वतःला वाहून घेतलेल्या त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. वेणूताई चव्हाण याही खऱ्या अर्थाने देशभक्तीने भारावलेल्या स्वातंत्र्यसेनानीच होत्या. तसेच त्या मृदू, प्रेमळ, सात्विक, मनमिळावू स्वभावाच्या असून समाजामध्ये सुसंस्कृतपणाचा आदर्श घालून देणाऱ्या समाजसुधारक होत्या. त्यांच्या जीवनातील विविध दाखले देऊन त्यांचे जीवन चरित्र त्यांनी उलगडले. भावनिक संवादातून वेणूताईचा जीवनपटच वक्त्यानी श्रोत्यांच्या डोळयापुढे उभा केला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री अल्ताफहुसेन मुल्ला( जनरल सेक्रेटरी, श्री शिवाजी शिक्षण संस्था, उच्च शिक्षण मंडळ, कराड) हे होते. ते म्हणाले की, " मा.यशवंतराव चव्हाण व सौ. वेणूताई चव्हाण यांचा जीवन प्रवास, वैचारिक वारसा सर्वांना आपल्या जीवनात प्रेरणा देणारा आहे. हा वारसा जतन करून ठेवण्यासाठी आदरणीय पी.डी. पाटील साहेब यांनी विशेष प्रयत्न केले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून मा. श्री जयंत पाटील काका (अध्यक्ष श्री. शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्ट, कराड) तसेच मा. श्री अरुण पाटील (काका) (विश्वस्त व सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, उच्च शिक्षण मंडळ, कराड) मा. श्री संजय बदीयानी (खजिनदार) मा. श्री अर्जुन ओझा, यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, कराडचे प्राचार्य डॉ. एस. बी. केंगार उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रा.डॉ. जी. ए. कदम यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. श्रीमती एस. पी. पाटील यांनी केले. या समारंभास दोन्ही महाविद्यालयाचे जिमखाना उपाध्यक्ष, उपप्राचार्य , प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

# कार्यक्रमाची क्षणचित्रे



सौ.वेणूताई चव्हाण यांना अभिवादन करत असताना प्रमुख पाहुणे व मान्यवर




भित्तीपत्रकाचे प्रकाशन करत असताना प्रमुख पाहुणे व मान्यवर





मान्यवरांचे स्वागत करत असताना प्र.प्राचार्य



प्रमुख पाहुणे मा.प्रा.डॉ.प्रभाकर पवार यांचा सत्कार करत असताना



मा.प्र.प्राचार्य स्वागत व प्रास्ताविक करताना



प्रमुख पाहुणे व अध्यक्षांची ओळख करून देत असताना





प्रमुख पाहुणे मा.प्रा.डॉ.प्रभाकर पवार उपस्थितांना मार्गदर्शन करत असताना

VENUTAI CHAVAN COLLEGE, KARAD
Estd.
1st May 1971